केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी जमीन संपादन करताना करावयाच्या मोजणी प्रक्रियेबाबत..

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२०२५/ प्र.क्र.१०७३/ई-१४९४५६८/भूमापन**

महसूल व वन विभाग, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १४ जानेवारी २०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १३६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.:-

*(१) हितसंबंध असलेल्या एखाद्या पक्षकाराने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास एखाद्या भूमापन क्रमाकांच्या किंवा पोटविभागांच्या सिमांची आखणी करता येईल व त्यावर सिमांची चिन्हे उभारता येतील.*

*(२) भूमापन क्रमाकांच्या किंवा पोटविभागाच्या सिमांची आखणी करताना जिल्हाधिकाऱ्याने अनुसरावयाच्या कार्यरितीचे नियमन करण्यासाठी, उपयोगात आणावयाच्या सिमांची चिन्हे कोणत्या प्रकारची असावीत हे विहित करण्यासाठी आणि आखणी करण्यात आलेल्या एखाद्या भूमापन क्रमाकांच्या किंवा पोटविभागाच्या जमीन धारकाकडून फी वसूल करण्याकरिता प्राधिकार देण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.*

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ या अधिनियमाखाली महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सीमाचिन्हे) नियम १९६९ हे नियम तयार करण्यात आले आहे. या नियमाच्या १३ (२) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.:-

*नियम १३ (२) संचालकाकडून त्यासंबंधी वेळोवेळी विहित करण्यात येईल त्या श्रेणीनुसार असलेली फी त्या अर्जासोबत भरली पाहिजे.*

३. सध्याच्या तरतूदीप्रमाणे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या प्रकल्पांकरिता जमीन भूसंपादन मोजणी करण्यासाठी प्रथमत: मोजणी फी भरणा करून घेण्यात येते. या प्रक्रियेस बराच कालावधी लागत असून त्यामुळे मोजणी प्रक्रिया सुरू होण्यास खूप विलंब होत असल्याचे आढळून येत आहे.

परिणामी, सदर प्रकल्पांचा खर्च मोठया प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे. हा विलंब टाळणे आवश्यक आहे.

प्रकल्प खर्चाच्या तुलनेत मोजणी फी ची रक्कम अल्प आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया लवकर होण्याकरिता व प्रकल्पाच्या खर्चात मोजणी अभावी होणारी अनावश्यक वाढ टाळण्याच्या दृष्टीने प्रथमत: विनाविलंब भूसंपादन मोजणी प्रक्रिया सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी जमीन भूसंपादन करताना मोजणी करण्यासाठी खूप कालावधी लागत आहे. त्यामुळे यासंदर्भात प्रथमत: भूसंपादन मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

केंद्र शासन किंवा राज्य शासनाकडील विविध प्रकल्पांसाठी संबंधित यंत्रणांनी समांतररित्या भूसंपादन मोजणी फी भरणा करुन घेण्याची कार्यवाही करावी. भूसंपादन मोजणी फी भरणा केल्यानंतरच भूसंपादन संयुक्त मोजणी अहवाल संबंधित यंत्रणेस उपलब्ध करून देण्यात यावा."

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०११४१८५७१९०५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.01.14 18:58:55 +05'30'

**( संजय बनकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई
३) सर्व विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
४) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
५) मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

११) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
१२) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
१३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
१७) निवडनस्ती (कार्यासन भूमापन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.